महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना/रुग्ण/पनवेल-उलवे/२०२० दिनांक : ४/०५/२०२०.

**वाचले:-**

**१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
**२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
**३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४**
**४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६**
**५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**
**६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०**
**७. तहसिलदार पनवेल यांजकडील पत्र क्र.फौजदारी/कात-२/कोरोना/कन्टेंनमेंट झोन/२०२०, दिनांक २/५/२०२०.**
**८. या कार्यालयाचे आदेश क्र. साशा/कार्या/ब-५/कोरोना/रूग्ण/पनवेल-उलवे/२०२०, दिनांक ०२/०५/२०२०.**
**९. तहसिलदार पनवेल यांचेकडील पत्र क्र.फौजदारी/कात-२/करोना/कन्टेंनमेंट झोन/२०२०, दि.०३/०५/२०२०.**
**१०. तहसिलदार पनवेल यांचेकडील पत्र क्र.फौजदारी/कात-२/करोना/कन्टेंनमेंट झोन/२०२०, दि.०४/०५/२०२०**

---

**सुधारीत आदेश,**

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ८ कडील आदेशान्वये रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यातील उलवे येथे १ कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, रुम नं.७०५, रिध्दी सिध्दी एक्झो बिल्डींग, प्लॉट क्र.बी ११, सेक्टर ८, उलवे, ता. पनवेल, जि.रायगड व त्यापासून पुर्वेस- प्लॉट नं.१०, पश्चिमेस-२४ मीटर रस्ता व प्लॉट नं.१३, १४, दक्षिणेस- प्लॉट नं.१२ व व २५, उत्तरेस- प्लॉट नं.१, १बी. हा परिसर/क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.१० अन्वये तहसिलदार पनवेल यांनी वैद्यकीय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र, उलवे नोड यांचे दि.०४/०५/२०२० रोजीचे सुधारीत अहवालानुसार कोरोना बाधीत रूग्ण रहात असलेली रिध्दी सिध्दी एक्झोटीका बिल्डींग, प्लॉट क्र.बी ११, सेक्टर ८, उलवे , ता.पनवेल ही इमारत Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहिर करणेबाबत विनंती केली आहे.

**सबब तहसिलदार पनवेल यांनी केलेल्या विनंतीनुसार या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र. ८ कडील आदेशामध्ये नमूद केलेले Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) व प्रतिबंध क्षेत्र हे खालीलप्रमाणे वाचणेत यावे.**

**सदर कोरोना रुग्ण रहात असलेली प्लॉट क्र.बी ११, सेक्टर ८, उलवे, ता.पनवेल येथील रिध्दी सिध्दी एक्झोटीका बिल्डींग, ही इमारत Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र) म्हणून जाहीर करण्यात येत आहे.**

या कार्यालयाकडील आदेश दिनांक २/५/२०२० मधील इतर निर्देश व घोषित करणेत आलेल्या Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्रासाठी दिनांक २/५/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेले निर्देश/सूचना हे वरील परिसरासाठी/क्षेत्रासाठी कायम राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१ , १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी, रायगड
Collector of Raigad

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- आयुक्त, महानगरपालिका पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- पोलीस निरीक्षक, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी